आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१ मे २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- संविधानाची प्रतिष्ठा जपण्यासाठी आपलं सरकार कटीबद्ध असल्याची पुनरुक्ती
- लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात महायुतीचं जागावाटप निश्चित, भाजपा २८, शिवसेना १५, राष्ट्रवादी काँग्रेस ४, तर रासपा १ जागा लढवणार
- आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल तेलंगणचे माजी मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांच्यावर निवडणूक आयोगाकडून ४८ तासाची प्रचारबंदी
- महाराष्ट्र आणि गुजरातचा पासष्टावा स्थापना दिन उत्साहात साजरा

**आणि**

- पुढचे पाच ते आठ दिवस विदर्भ, मराठवाडा, दक्षिण राजस्थान, मध्यप्रदेश, आणि गुजरातच्या काही भागात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज गुजरातमधे बनासकाठा जिल्ह्यात ‘दिसा’ इथं प्रचारसभा घेतली. संविधानाची प्रतिष्ठा जपण्यासाठी आपलं सरकार कटीबद्ध असल्याची पुनरुक्ती त्यांनी या सभेत केली. संविधानानं अनुसूचित जाती- जमाती आणि इतर मागासवर्गीयांना दिलेल्या आरक्षणाच्या अधिकारचं संरक्षण आपलं सरकार करेल, असं ते म्हणाले. पुन्हा सत्ता मिळाल्यावर आपलं सरकार भारताला जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनवेल, विकसित गुजरातच्या माध्यमातून विकसित भारताची निर्मिती करेल, असं ते म्हणाले. काँग्रेस मतपेढीचं आणि अनुनयाचं राजकारण करत असल्याची टीका मोदी यांनी यावेळी केली.

<><><><><>

ज्येष्ठ भाजपा नेते संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज उत्तरप्रदेशात, आंवला आणि फतेहपूर सिक्री लोकसभा मतदारसंघांमधे प्रचारसभा घेतल्या. या सभांमधे त्यांनी केंद्रसरकारच्या कामगिरीचा आलेख मांडला.

समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव यांनी ईटावा जिल्ह्यात जस्वंद नगर इथं सभा घेतली. भाजपाला पुन्हा सत्ता मिळाली, तर ते राज्यघटना बदलतील, असा आरोप त्यांनी या सभेत केला. मैनपुरीमधेही त्यांनी सभा घेतली.

काँग्रेस नेते राजीव शुक्ला यांनी लखनौ इथं वार्ताहरपरिषद घेतली. कोविड-१९ च्या लसीमुळे अनेक मृत्यू झाले, त्याला भाजपा जबाबदार आहे, असा आरोप त्यांनी यावेळी केला.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात महायुतीचं जागावाटप निश्चित झालं असून भाजपा २८, शिवसेना १५, तर राष्ट्रवादी काँग्रेस ४ जागा लढवणार आहे. रासपाचे महादेव जानकर एक जागा लढवणार आहेत. शिवसेना नेते उदय सामंत यांनी कोल्हापूर इथं ही माहिती दिली.

शिवसेनेनं तीन ठिकाणच्या उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. त्यात नाशिकमधून हेमंत गोडसे आणि कल्याणमधून श्रीकांत शिंदे या विद्यमान खासदारांना पुन्हा संधी दिली आहे. ठाणे मतदारसंघात माजी महापौर नरेश म्हस्के महायुतीचे उमेदवार असतील.

काँग्रेसनं मुंबई उत्तर मतदारसंघातून भूषण पाटील यांना उमेदवारी दिली आहे. पालघरच्या जागेवर भाजपा उमेदवार जाहीर करेल, असं प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नाशिकमध्ये जाहीर केलं.

<><><><><>

वरिष्ठ भाजप नेत्या मेनका गांधी यांनी उत्तर प्रदेशात सुल्तानपूरमधून आज उमेदवारी अर्ज भरला. त्याबरोबर साध्वी निरंजन ज्योती, हरीश द्विवेदी, जगदंबिका पाल , दिनेश लाल यादव निरुह , लल्लू सिंग , नीरज त्रिपाठी आणि प्रवीण पटेल या उत्तर प्रदेशातल्या इतर वरिष्ठ भाजप नेत्यांनीही आज आपापल्या मतदार संघात उमेदवारी अर्ज भरले. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कराज सिंग धामी आणि भाजप नेते अनुराग सिंग ठाकूर यावेळी झालेल्या शक्तिप्रदर्शनात सहभागी झाले होते.

समाजवादी पक्षाचे उमेदवार रविदास मल्होत्रा, बसपा उमेदवार श्रीकाला रेड्डी, शिव कुमार दोहरे, आणि काँग्रेस-सपा युतीचे उमेदवार तनुज पुनिया यांनीही आपले उमेदवारी अर्ज आज भरले.

<><><><><>

तेलंगणचे माजी मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांना निवडणूक आयोगानं ४८ तास प्रचारबंदी केली आहे. काँग्रेसविषयी केलेल्या कथित आक्षेपार्ह आणि अपमानास्पद वक्तव्याबद्दल त्यांच्यावर आयोगानं ही कारवाई केली आहे. त्यांच्यावरची बंदी आज रात्री ८ वाजल्यापासून लागू झाली आहे. या ४८ तासात त्यांनी जाहीरसभा, मिरवणुका घेऊ नयेत, तसंच निवडणुकासंदर्भात मुलाखती देऊ नयेत, असे निर्देश आयोगानं त्यांना दिले आहेत.

<><><><><>

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण नंदुरबार लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

पासष्टावा महाराष्ट्र दिन आज राज्यात सर्वत्र उत्साहानं साजरा करण्यात आला. राज्याचा मुख्य शासकीय सोहळा मुंबईत शिवाजी पार्क इथं झाला. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं, यावेळी राज्यपालांनी विविध दलांच्या संचलनाची पाहणी करून मानवंदना स्वीकारली. नवा, समृद्ध आणि सशक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी नागरिकांनी एकत्र यावं, असं आवाहन राज्यपालांनी भाषणात केलं. कामगार दिनानिमित्त, राज्याच्या तसंच देशाच्या जडणघडणीत अमूल्य योगदान देणाऱ्या सर्व कामगारांनाही त्यांनी शुभेच्छा दिल्या.

सध्या सुरु असलेल्या लोकसभा निवडणुकीत नागरिकांनी मतदानाचा अधिकार बजावण्याचं आवाहनही राज्यपालांनी यावेळी केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, विविध देशांचे वाणिज्यदूत, सशस्त्र दलांचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते. हुतात्मा चौकात महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते ध्वाजारोहण झालं.

<><><><><>

गुजरातचाही आज स्थापना दिवस असून, त्यानिमित्त गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गुजरातच्या स्थापनेत आणि विकासाच योगदान देणाऱ्या सर्वांना मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या संदेशात वंदन केलं आहे. गुजरात राज्य उद्योगाच्या वैभवानं सजलं आहे. या राज्याला ईश्वराचा आशीर्वाद, साधुसंतांची शक्ती, निर्सगाचं वैभव आणि शूरांचं शौर्य लाभलं आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

यंदाच्या मे महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा तापमान जास्त राहणार असून दक्षिण राजस्थान, पश्चिम-मध्यप्रदेश, विदर्भ, मराठवाडा आणि गुजरात भागात येत्या पाच ते आठ दिवसात उष्णतेची लाट पसरलेली राहील, असा भारतीय हवामान विभागाचा अंदाज आहे.

देशातल्या ईशान्य कडचा काही भाग, वायव्य आणि मध्य भाग वगळता देशातल्या बहुतांश भागांमध्ये कमाल तापमानापेक्षा अधिक तापमान राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तर वायव्य कडचा काही भाग वगळता देशातल्या बहुतांश भागात किमान तापमान सामान्यपेक्षा जास्तच राहील, असं म्हटलं आहे. तसंच इंडो-गंगेच्या मैदानी प्रदेशात, मध्य भारत आणि ईशान्य भारताच्या बहुतांश भागांमध्ये सामान्य ते सामान्य तापमानापेक्षा कमी तापमान राहण्याची शक्यता आहे.

तर राजस्थान, पूर्व मध्यप्रदेश, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि छत्तीसगडच्या काही भागातही सारखीच परिस्थिती राहील असा अंदाज आहे. उत्तर तामिळनाडू आणि आंध्रप्रदेशच्या विशिष्ट भागात देखील तापमानाचा पारा चढाच राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ मृत्युंजय महापात्रा यांनी कमाल तापमानाचासामना करण्यासाठी पुरेशा उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

यंदाच्या मे महिन्यात देशात सरासरी पाऊस सामान्य असण्याची शक्यता असून वायव्य भारतातल्या बहुतेक भागांमध्ये, मध्य द्वीपकल्पीय आणि ईशान्य

भारताच्या काही भागात सामान्य ते सामान्यांपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे.

<><><><><>

जगाच्या आर्थिक उन्नतीत कामगारांच्या सहभागाचा गौरव म्हणून आजचा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा होत आहे. १९८९ मध्ये युरोपातल्या अनेक सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला होता.

<><><><><>

केंद्रसरकारी कर्मचाऱ्यांना अपत्यांच्या शिक्षणासाठी आणि वसतिगृहातल्या निवासापोटी मिळणाऱ्या भत्त्यात वाढ झाली आहे. कर्मचाऱ्यांना मिळणारा महागाई भत्ता गेल्या जानेवारीत मूळ वेतनाच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचल्यावर हा बदल झाला आहे. केंद्र सरकारच्या कर्मचारी, गाऱ्हाणी आणि प्रशिक्षण विभागाच्या आदेशानुसार दरमहा शैक्षणिक भत्ता २ हजार ८१२ रुपये तर वसतिगृह भत्ता ८ हजार ४३७ रुपये निश्चित करण्यात आला आहे. दिव्यांग अपत्यांसाठीचा शैक्षणिक भत्ताही दरमहा ५ हजार ६२५ रुपये करण्यात आला आहे.

<><><><><>

आयपीएल टिट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नईतल्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर, चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा. चेन्नई सुपर किंग्ज नवव्या षटकात २ बाद ६५ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//